ISSN-2349-638x

Impact Factor - 6.293

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

## Special Issue No.69

### Editor's

**Mr. Amol Pagar**

**Dr. Arvind Kadam**

### Chief Editor

**Pramod P. Tandale**

IMPACT FACTOR

SJIF 6.293

For details Visit our website

www.aiirjournal.com

No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc; Without prior permission.

**Aayushi International Interdisciplinary Research Journal**
**ISSN 2349-638x**
**Special Issue No.69 ( March 2020 )**

Disclaimer

Research papers published in this Special Issue are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the Editor of this special Issue are not responsible in any form.

| Sr.No. | Name Of Author | Title Of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 91 | प्रा. लता माने | आर्थिक विकासात महात्मा गांधीजीचे योगदान | 266 |
| 92 | डॉ. माधव नरहारी कांबळे | महात्मा गांधीजींच्या सामाजिक ऐक्य विचाराची एकविसाव्या शतकातील प्रासंगिकता | 269 |
| 93 | प्रा. तातेराव जगन्नाथराव नंदवे | महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर : विचार मंथन | 271 |
| 94 | प्रा. प्रदिप मारोती लंजिले | गांधी समजून घेताना, गांधीचे एकादश व्रत | 275 |
| 95 | डॉ.चंदन मारोतीराव बावलगावे<br>राहुल पंढरी कांबळे | भारतीय स्वातंत्र्यलढ्यात गांधीवादी स्त्रियांचे योगदान | 277 |
| 96 | डॉ. आर. डी. शिंदे | 'नई तालीम' अभिनव क्रांतीचा प्रयोग | 280 |
| 97 | डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे | महात्मा गांधी आणि हिंद–स्वराज्य | 282 |
| 98 | ऋषिकेश वैजनाथ शिरुरे | महात्मा गांधीजी आणि ग्रामस्वराज्य | 284 |
| 99 | राम कोंडीबा सदानंदे | महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्यांची कल्पना | 286 |
| 100 | प्रा. संजयादेवी पवार (गोरे) | महात्मा गांधींचे एक आदर्शवादी शैक्षणिक धोरण | 288 |
| 101 | उमा ज्ञानोबा साठे | महात्मा गांधीच्या विचारातील ग्रामस्वराज्य संकल्पनेचा अभ्यास | 290 |
| 102 | डॉ. शेख शहाजहान बशीर | आजच्या जगात गांधी विचारांची आवश्यकता | 292 |
| 103 | डॉ. शिवाजी पाते | महात्मा गांधीची विश्वस्त कल्पना | 294 |
| 104 | शिवरूद्र शरणप्पा बदनाळे | महात्मा गांधी आणि सत्याग्रह | 296 |
| 105 | सुलक्षणा भारत पाटील | म.गांधी यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान आणि तत्त्वज्ञान | 299 |
| 106 | प्रा. सुनिता शंकरराव कांबळे | ग्रामीण विकासात महात्मा गांधीजींचे विचार आणि भूमिका | 301 |
| 107 | डॉ. विजयकुमार गणपत तांबारे | महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य | 304 |
| 108 | डॉ. उद्धव न. कांबळे | महात्मा गांधीजींच्या अहिंसा संकल्पनेची प्रासंगिकता | 306 |
| 109 | प्रा. विजय किशनराव पांचाळ | महात्मा गांधीची ग्रामस्वराज्य संकल्पना | 309 |
| 110 | प्रा. विजय नागनाथ तोंडारे | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार | 311 |
| 111 | प्रा. विकास दशरथ वाघमारे | सद्यस्थितीत महात्मा गांधीजींच्या विचारांचे महत्त्व | 314 |

# महात्मा गांधी आणि सत्याग्रह

**शिवरूद्र शरणप्पा बदनाळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

**प्रस्तावना :**

सत्याग्रह म्हटले की गांधीजी आठवतात. गांधी आणि सत्याग्रह हे जणू समानार्थी शब्द आहेत. सत्याग्रह ही संकल्पना गांधीजीची आपल्या देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला दिलेली अपूर्व देणगी आहे. सर्वप्रथम दक्षिण आफ्रिकेत त्यांना सत्याग्रहाची संकल्पना सूचली. त्यांच्या राजकीय विचारांचा आणि व्यवहाराचा समन्वय म्हणजे सत्याग्रहाचा विचार होय. सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह धरणे होय. सत्याग्रहात प्रतिपक्षावर हिंसा करता येत नाही. त्यात सत्याला संरक्षण द्यावे लागते. स्वत: यातना सहन करून प्रतिपक्षाचे अंतकरण बदलावे लागते. सत्याग्रहाचा विचार तसा जुनाच आहे. पूर्वी सामाजिक जीवनात त्यांचा प्रयोग केला जात असे. परंतू गांधीजीनी मात्र त्याला राजकारणाच्या व्यापक पातळीवर अधिष्ठाण मिळवून दिले. राजकीय पातळीवर होणारे अन्याय, अत्याचार, जुलूम याविरुध्द उभारलेला लढा म्हणजे सत्याग्रह होय. दुबळ्या जनतेस शक्ती प्रेरणा देण्याचे कार्य सत्याग्रह करीत असते. अपप्रवृत्तीवर विजय मिळवण्याचे एक प्रभावी साधन होय. त्यासाठी आत्मक्लेश सहन करण्याची मनाची तयारी असावी लागते. सत्याग्रहीने हिंसेचा किंवा शक्तीचा कधीही वापर करु नये. त्यात वापर करावा तो प्रेम आणि सत्य याचाच आणि त्याद्वारे प्रतिपक्षास आपली बाजू पटवून द्यावी गांधीजी म्हणतात की, येशू ख्रिस्ताने सत्यासाठी फार यातना सोसल्या. खूप क्लेश सहन केले. सॉक्रेटिसने तर सत्यासाठी आत्मत्याग करण्यास ही मागे पूढे पाहिले नाही. पण हे करताना त्यांनी प्रतिपक्षाचा रागही केला नाही किंवा द्वेषही केला नाही. त्यामुळेच ते सर्वोच्च कोटीतील पुरूषांच्या नामावलीत आले जो हिंसा करेल त्याला प्रेमाने जिंकले पाहिजे व त्यांच्या अंत:करणात परिवर्तन घडवून आणता आले पाहिजे. शत्रुवर प्रेम करणे अवघड आहे. त्यासाठी मनाची उंची गाठावी लागते व त्यांच्या अंत:करणात परिवर्तन घडवून आणता आले पाहिजे. सत्य आणि अहिंसेच्या मदतीने दुष्ट प्रवृत्तीशी मुकाबला करणे म्हणजे सत्याग्रह होय. दुष्ट प्रवृत्तीशी अन्यायीवृत्तीशी आणि खोट्या प्रवृत्तीशी सामना करणे म्हणजे सत्याग्रह होय. गांधीजींच्या मते, सत्याग्रह हा मार्ग तसा प्रत्येक्षात आणणे खूप अवघड आहे. त्यात यातना, कष्ट सहन करण्याची तयारी असावी लागते. तसेच मनावर ताबा आणि मनोनिग्रह यांचीही फार मोठी आवश्यकता त्याठिकाणी असते.

**संशोधनाचे महत्त्व** :गांधीजींच्या सत्याग्रह, सत्य, अहिंसा नैतिकता इत्यादी विचारांवर प्रकाशझोत टाकणे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये** :महात्मा गांधजींच्या सत्याग्रह, सत्य, अहिंसा नैतिकता इत्यादी विचारांना समजून घेणे.

**संशोधनाचे पद्धती** :प्रस्तूत शोधनिबंधातील आवश्यक सर्व माहिती दुय्यम स्त्रोतांद्वारे संकलीत केली आहे. ग्रंथ, पुस्तके प्रकाशित माहिती, वृत्तपत्रातील लेख संशोधन अहवाल व मासिकांद्वारे संकलित केली आहे.

**सत्याग्रहीचे आवश्यक गुण-**

अन्यायी, जुलमी शोषक अशा परिस्थितीत बदल घडवून आणने अनेकदा लोकांना आवश्यक वाटते. पण हा बदल मात्र केवळ शांततेच्याच मार्गाने झाला पाहिजे. त्यांच्यामुळे सत्याग्रही कसा असावा हेही गांधींजीनी सांगितले आहे. त्यांच्या मते, - सत्याग्रहीची ईश्वरावर श्रद्धा असावी त्यामुळे विरोधकाचा त्रास सहन करण्याची क्षमता पात्र होते. संपत्ती आणि प्रसिद्धीची हाव नसावी, आरोग्य उत्तम असावे, तो भित्रा नसावा, ध्येयनिष्ठ असावा, द्वेष, क्रोध, घृणा लोभ, मोह, यांच्या आहारी जाऊ नये. स्वार्थासाठी सत्याग्रहाचा मार्ग स्विकारू नये, विरोधकराबद्दल त्यांच्या मनात प्रेम आणि आदर असावा, लाचारीची तडजोड करु नये, शत्रु संकटात असेल तेंव्हा सत्याग्रह करू नये. असे शुद्ध आचरणाचे नियम गांधीजींनी सांगितले असून कसल्याही परिस्थितीत हिंसेच्या मार्गाचा स्विकार करू नये. हिंसेला प्रेमानेच जिंकले पाहिजे. प्रथम अन्यायाविरूद्ध इतर सर्व मार्गाचा उपयोग केल्यानंतर शेवटी सत्याग्रहाचा मार्ग स्विकारला पाहिजे. कारण हा प्रत्यक्ष कृतीचा प्रभावी मार्ग असतो.

**सत्याग्रहाची साधने :**

गांधीजींच्या मते, सत्याग्रह अंमलात आणण्याचे विशिष्ट असे एक यशस्वी साधन नसते. परिस्थितीनुसार योग्य साधनाची निवड करावी लागते. त्यासाठी त्यांनी सत्याग्रहाची विविध साधने सांगितली आहेत.

**असहकार** : गांधीजींच्या मते, अनिष्ट, जाचक चालीरितींना काढून टाकण्यासाठी असहकार मार्गाचा वापर केला जातो. ज्या ज्या ठिकाणी अन्याय आहे. जूलूम आहे त्या त्या ठिकाणी नागरिकांनी असहकार पुकारावा आपले सहकार्य नाकारावे. जे जे काही अनिष्ठ आहे, वाईट आहे त्यांच्याशी असहकार करणे हे नागरिकांनी आपले प्रथम कर्तव्य मानले पाहिजे. जर लोकांनी सहकार्य करायचे पूर्णत: नाकारले तर कोणत्याही सरकारला कामकाज चालवणे अवघड होऊन बसेल. कारण कोणत्याही सरकारला कार्य करण्यासाठी लोकांची मान्यता आवश्यक असते. अगदी कट्टर हूकुमशहाला राज्य चालविण्यासाठी लोकांच्या सहकार्याची गरज असतेच. लोकांचे सहकार्य नसले की, सरकार कोसळेल व शोषण आपोआप थांबेल. गांधीजींनी असहकाराचे खालील मार्ग सांगितले आहे.

**हरताळ** : हरताळ म्हणजे संपूर्ण कामकाजावर बहिष्कार टाकणे होय. कामकाज बंद करून ठेवले की, प्रतिपक्ष वठवणीवर, योग्य रस्त्यावर येऊ लागते. विद्यार्थी, शिक्षक, व्यापारी इत्यादी वर्गातील सर्वच व्यक्तींनी विशिष्ठ वेळी कामकाज ठप्प करून असहकार पुकारावा. असे झाले की अन्याय होत आहे हे सर्वांच्या लक्षात येते. लोकांमध्ये हळू जागृती होते प्रतिपक्षास त्यामुळे जाग येते. त्यामुळे आपोआपच जनतेची होणारी पिळवणूक व शोषण थांबते. हरताळाचे वैशिष्ट्य की, यात हिंसा घडत नाही. मात्र प्रतिपक्षावर मोठा दबाव येतो. त्यामुळे हरताळ खऱ्या अर्थाने पूर्ण नैतिक आहे.

**सामाजिक बहिष्कार :** लोकमान्य टिळकांनी प्रथम बहिष्काराचा अवलंब केला. गांधींनी बहिष्कार हा सत्याग्रहाचा मार्ग होऊ शकतो असे सांगितले. जे लोक असहकार आंदोलनात सहभागी होत नाहीत. त्यांच्या विरुद्ध बहिष्काराचा उपयोग करावा. सामाजिक जीवनातील त्यांचा प्रवेश नाकारला जावा. यामुळे समाजातील दुष्ट प्रवृत्तींना आळा बसेल अशा प्रवृत्ती नष्ट होतील. संबंधित व्यक्तीला आपल्या चुकांची जाणीव होते. आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी बहिष्कार हे अतिशय उपयुक्त साधन आहे

**धरणे** : धरणे म्हणजे, बसून राहणे ठिय्या देणे एखादा जुलमी अधिकारी विनाकारण काम थकत असेल निर्णय घेत नसेल तर ज्याच्यावर अन्याय झाला ते लोक व कार्यकर्ते मिळून त्या अधिकाऱ्याच्या कार्यालयासमोर धरणे धरावे अन्यायाकडे जनतेचे लक्ष वेधण्याचा हा उत्तम व नैतिक असा मार्ग असून त्यांच्या अवलंब सनदशीर पद्धतीने करणे गरजेचे असते.

**सविनय कायदेभंग** : सविनय कायदेभंग हा सत्याग्रही असहकार्याचा एक भाग आहे. अमुक एक कायदा अन्यायकारक आहे. मला तो मान्य नाही. तो कायदा मी मुकाट्याने सहन करणार नाही. त्यासाठी आधी सरकारला पूर्व सूचना देऊन नम्रपणे तो कायदा मोडणार शिक्षा स्विकारणार यालाच सविनय कायदेभंग असे गांधीजीने म्हटले आहे. म्हणजेच अहिंसात्मक मार्गानेच कायदेभंग करावा यावर गांधीजींचा संपूर्ण भर होता. समाज हिताकडे सरकारचे दुर्लक्ष होत असेल तर सविनय कायदेभंगाचा मार्ग अनुसरावा अन्यायी आणि जुलमी कायद्याला विरोध झाला पाहिजे. त्याबदल्यात शिक्षा झाली तर ती भोगली पाहिजे व हिंसाचार होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

**हिजरत** : गांधीजी म्हणतात की सत्याग्रहीने वापरण्याचे हिजरत हे एक अतिशय महत्त्वाचे साधन आहे. अनेकदा एखाद्या व्यक्ती अथवा गटावर तेथील जनतेमध्ये विरोध करण्याची शक्ती नसते. अशावेळी हिजरतचा वापर करणे आवश्यक ठरते. हिजरत म्हणजे ज्या गटावर अन्याय झाला आहे. तेथील लोकांनी स्थलांतर करावे तो प्रदेश सोडून जावा. इ.स. १९३० मध्ये गुजरातमधील बारडोली येथे गांधीजीनी असाच सल्ला दिला होता.

**उपोषण** : गांधीजींच्या मते, उपोषण ही एक तपश्चर्या आहे. ती एक साधना आहे. तसेच तो एक आत्मक्लेषाचा मार्ग आहे. उपोषणाचे काही महत्त्वाचे प्रभावकारी परिणाम असे की उपोषणाने आत्मशुद्धी होते. प्रत्येक व्यक्तीने उपोषण करण्याची गरज नाही. उपोषण त्यानेच करावे ज्याचे आत्मबल खूप मोठे आहे आणि आपल्या

ध्येयाबाबत जो अविचल ठाम आहे. असे घडले नाही तर उपोषण हे प्रभावी साधण सिद्ध होऊ शकत नाही. उपोषणामुळे प्रतिपक्षास कोणत्याही प्रकारची इजा किंवा दुःख दिले जात नाही. उपोषणामुळे सत्याग्रहीला एवढे मोठे आत्मक्लेष होतात की त्यातून प्रतिस्पर्ध्याच्या अंतःकरणात बदल होऊ शकतो. आणि त्यातून त्याचे हृदय परिवर्तन करणे शक्य होते. महात्मा गांधींनी या साधनाचा उपयोग दक्षिण आफ्रिकेत आणि भारतात अतिशय यशस्वीरितीने केला होता.

**संप :** संप हे साधन आज सर्वमान्य साधन बनले आहे. गांधीजींच्या मते अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी कामगारांनी संपाचे हत्यार वापरावे. कामगारांनी कारखान्याच्या सर्वांगीन प्रगतीसाठी संपाचा न्याय वापर केला पाहिजे. जुलुम आणि अन्याय यांच्या निवारणासाठी संपाचा अवलंब अवश्य केला पाहिजे. पण यात हिंसेचा थोडाही वापर होता कामा नये. संपात कामगारांने लाचारीची तडजोड कधीही करू नये. तडजोड करताना सत्य आणि तत्व यांचा कधीही बळी देऊ नये.

**निष्कर्ष :**

गांधीजींनी सत्याग्रहाची कल्पना अभिनव स्वरूपात मांडली व त्याला नैतिक अधिष्ठान आणि आध्यात्मिक आधार दिला. भारताच्या त्याचेळेच्या परिस्थितीत हीच एकमेव योग्य कल्पना होती. असे म्हणता येईल गांधीजींनी केवळ स्वदेशाच्या संदर्भातच नव्हे तर परदेशाचे आक्रमण झाले असता सत्याग्रह कसा करावा याचे नैतिक दृष्टिकोणातून विवेचन केले आहे. आक्रमकांनी आपल्या भूमिवर कब्जा केल्यानंतर त्याला जर लोकांनी अजिबात सहकार्य नाही दिले तर सत्ता टिकवून ठेवणे फार कठीण जाईल. तसचे गांधीजी म्हणतात की, सत्याग्रहात अहिंसेला एक नैतिक मुल्य म्हणून फार महत्वाचे स्थान असते आक्रमक कितीही क्रुर असला तरी त्याला सुद्धा अंतकरण असते. त्यांच्यात अनुकंपा सहानुभूती या भावना निर्माण होऊ शकतात आक्रमकांचा नैतिक पातळीवर निश्चित पराभव होतो. तोच खऱ्या अर्थाने पराभूत होतो. गांधीजींची विचार पूर्णपणे नैतिक मुल्यांवर आधारलेले असून सत्य हा त्यांचा आधार आहे. गांधीजी म्हणतात की, जे उद्दिष्ट आपल्याला साध्य करायचे आहे. ते शुद्ध व स्वच्छ असलेच पाहिजे त्याचबरोबर ते साध्य करण्यासाठी आपण जे मार्ग वापरतो तेही शुद्ध स्वरूपाचे असले पाहिजेत. यावर गांधीजींचा भर होता.

**संदर्भ :**

१. भोळे, भा. ल., भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर जूलै २०१४.
२. बोराळकर, कृ. दि., भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर जून १९९२.
३. कस्तुरे - वाडकर, प्रभा, पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत अरूणा प्रकाशन, लातूर ऑगस्ट, २०११.
४. राठी, शुभांगी भारतीय राजकीय विचारवंत कैलास प्रकाशन, औरंगाबाद, आगस्ट २०१६.
५. शिंदे ज. रा., आधुनिक राजकीय विचारवंत कैलास प्रकाशन, औरंगाबाद, १९८८.
६. देवरे, पी. डी., व इतर, आधुनिक राजकीय विचारवंत प्रशांत प्रकाशन, पुणे २००४.
७. अघाव, विलास व इतर, भारतीय राजकीय विचारवंत चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, आगस्ट २००४.